नियमित ख.क्र. ४७/२०२३
सरकार वि. प्रेमनाथ
नि.क्र. २४

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.०१ शपथेवरः-**

माझे नाव - दयानंद व्यंकटराव मुगळे,
वय ४० वर्षे, कामधंदा - शेती,
रा. किनीनवरे, ता. औसा, जि. लातूर.

**सरतपास विद्वान सरकारी अभियोक्ता श्री. एस.एस.वाघमारे मार्फत शपथेवर सुरु :-**

१. माझी मौजे किनीनवरे गट क्र. १३८ मध्ये ३ हेक्टर ८० आर असणारी जमीन माझ्या वडीलांच्या नावे आहे. सदरची जमीन मी आणि माझे वडील कसतो. आरोपी माझे शेत शेजारी असल्यामुळे मी त्यांना ओळखतो. दि. १४.१२.२०२२ रोजी दुपारी १२.०० च्या सुमारास वर नमुद गट नंबरमध्ये आरोपी व माझ्यामध्ये फिर्यादमधील घटना घडली होती. त्या दिवशी आरोपी माझ्या शेतामध्ये स्पीकलरने पाणी देत होते म्हणुन त्यांना मी विचारणा केली की, माझ्या शेतामध्ये का पाणी देत आहात म्हणुन त्यांनी मला शिवीगाळ करून मारहाण केली. आरोपी प्रेमनाथ याने नोझल माझ्या छातीवर मारला त्यामुळे मी खाली पडलो असता आरोपी इंदुबाई हिने विळयाने माझ्या उजव्या मांडीवर वार केला. त्यामुळे माझ्या उजव्या मांडीतुन रक्त येवु लागले. तेथुन मी पोलीस स्टेशनला गेलो आणि आरोपीविरूध्द गुन्हा नोंद केला. अतिवृष्टीमुळे आरोपींच्या शेतामध्ये चिखल झालेला होता त्यामुळे त्यांनी आम्हाला आमच्या शेतातील शेडमध्ये बैल बांधण्यासाठी जागा मागीतली, त्याच्या मागणीप्रमाणे त्यांना आम्ही बैल बांधण्यासाठी जागा दिली, परंतु त्यांनी नंतर दुसरे शेड मारून जमीनीवर कब्जा केला. आरोपींना मी माझ्या शेतामध्ये पाणी का देत आहेत असे विचारले असता त्यांनी सांगितले की, शेत आता आमचेच झाले आहे तुला काय करायचे ते कर, तुला खल्लास मारतो अशी मला धमकी दिली. मी सांगितल्याप्रमाणे पोलीसांनी माझी तक्रार लिहुन घेतली. आता मला सदरची तक्रार दाखवण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास नि.क्र. पी.-१/पी. डब्ल्यु-१ देण्यात येते. पोलीसांना मी जमीनीचा ७/१२ व ८- अ चा उता-याच्या

फोटो कॉपी दिल्या होत्या. आज रोजी मी मुळ ७/१२ उतारा व ८ – अ चा उतारा दाखल केला आहे. त्यास अनुक्रमे नि.क्र. २५ व २६ देण्यात येतो. आरोपींनी मला ज्या हत्यारांनी मारहाण केली. ते दाखवल्यास मी ओळखु शकतो. आज रोजी मला जप्त मुदेमालातील नोझल व विळा दाखवण्यात आला. सदर नोझल आणि विळयांनी आरोपींनी मला मारहाण केली होती. त्यास अनुक्रमे एम. ओ.–१ आणि एम.ओ–२ संबोधण्यात येते. आरोपींना पाहिल्यास मी ओळखु शकतो. आज रोजी आरोपी प्रेमनाथ जाधव न्यायालयात हजर आहे.

**सरतपास संपला.**

**मध्यान्हाची वेळ झाली असल्यामुळे उलट तपास तहकुब.**

सा.वा.दा.अ.ब.अ.कबूल केले.

Digitally signed by NALAWADE SHUBHANGI HEMANT
Date: 2026.05.13 16:11:52 +0530

(एस. एच. नलावडे)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
औसा
दि. १३.०५.२०२६

माझे समक्ष,

Digitally signed by NALAWADE SHUBHANGI HEMANT
Date: 2026.05.13 16:11:38 +0530

(एस. एच. नलावडे)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
औसा
दि. १३.०५.२०२६

**उलटतपास आरोपी तर्फे विदवान विधीज्ञ श्री. एस.डी. भाग्यवान मार्फत**.

**२.** माझे आजोबा नारायण यांना एक भाउ आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे आजोबा नारायण माझे वडील आणि वामन अशी दोन मुले आहेत. माझया आजोबाचे भाउ यांना आरोपी प्रेमनाथ हा मुलगा आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील आणि आरोपी हे चुलत भाउ आहेत. माझया आजीचे नाव प्रेमाबाई आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रेमनाथ यांच्या आईचे नाव भागीरथीबाई असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रेमाबाई आणि भागीरथीबाई या सख्खा बहीणी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी प्रेमनाथ माझया वडीलांचा चुलत आणि मावस भाउ आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझया आणि वामन यांच्या जमीनीच्या पुर्व बाजुस खरोसा गावची शिव आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझया आणि वामन यांच्या जमीनीच्या पश्चीम बाजुस आयोध्याबाई यांची जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. १३८ च्या ७/१२ उता-यावर आयोध्याबाई यांचे

नाव आहे.

**प्रश्नः** आयोध्याबाई यांच्या जमीनीच्या चतुसीमा सांगता येतील काय ?

**उत्तर :** आमच्या जमीनीच्या वाटण्या झालेल्या नाहीत.

**३.** हे मला माहीत नाही की, प्रेमनाथ यांचा मुलगा पुणे येथे राहतो. हे म्हणणे खरे आहे की, वादातील शेडमध्ये आरोपी राहतात. हे म्हणणे खरे आहे की, माझया वडीलांनी आरोपी प्रेमनाथ विरूध्द दिवाणी दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यातील नि.क्र. ५ चा अर्ज फेटाळण्यात आला आहे.
प्रश्न : वर नमुद दाव्यामध्ये तुमचे चुलते आणि आत्या यांनी सन २००० पासुन आरोपी २.५ एकर जमीनीचा वाटणीने ताबेदार आहे असे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे ?
उत्तर : आम्ही त्यांच्याशी बोलत नसल्यामुळे त्यांनी खोटे शपथपत्र दाखल केले आहे.

**४.** हे म्हणणे खरे नाही की, आरोपी प्रेमनाथ यांना गावात घर नाही. हे म्हणणे खरे नाही की, भुकंपापासुन आरोपी प्रेमनाथ त्याला वाटुन आलेल्या जमीनीमध्ये शेड मारून राहतात.

**५.** माझया उजव्या मांडीतुन **रक्त निघाले** हा मजकुर माझया तक्रारीमध्ये नमुद नाही. सदरचा मजकुर माझया तकारीमध्ये का नमुद नाही याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, अतिवृष्टीमुळे आरोपींच्या शेतामध्ये चिखल झालेला होता. त्यामुळे त्यांनी आमच्या शेतातील शेडमध्ये बैल बांधण्यासाठी जागा मागीतली हा मजकुर माझया तक्रारीमध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, तसेच आरोपींनी दुसरे शेड मारून माझया जमीनीवर कब्जा केला हा मजकुर माझया तकारीमध्ये नमुद नाही. वर नमुद दोन्ही मजकुर माझया फिर्यादमध्ये का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

**६.** हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या शेडच्या पुर्व बाजुस शिवाजी मोरे, पश्चिम दिपक जाधव, दक्षिणेस माणिक तोडकर यांची जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर शेडच्या उत्तर बाजुस छायाबाई यांची जमीन आहे. हे मला माहीत नाही की, छायाबाई यांना सदरची जमीन व्यंकट तोडकर यांनी

विक्री केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, २ एकर २० गुंठे जमीन आरोपी प्रेमनाथ यांच्या वाटणीला दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाटणीपासुन आरोपी प्रेमनाथ सदर जमीनीवर मालक या नात्याने कब्जादार आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरची जमीन बळकावण्यासाठी मी आरोपीविरूध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीविरूध्द दाखल केलेल्या दाव्यामध्ये मनाई हुकूम मिळाला नाही त्यामुळे आरोपीविरूध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीची जमीन बळकावण्यासाठी मावस काका, मामा, आत्या यांनी समजावुन सांगुन आरोपींना त्रास देण्यासाठी त्यांच्या भांडण करतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या वाटुन आलेल्या जागेमध्ये ३० वर्षापासुन घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास संपला.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

सा.वा.दा.अ.ब.अ.कबूल केले.

Digitally signed by NALAWADE SHUBHANGI HEMANT
Date: 2026.05.13 16:12:19 +0530

(एस. एच. नलावडे)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
औसा
दि. १३.०५.२०२६

माझे समक्ष,

Digitally signed by NALAWADE SHUBHANGI HEMANT
Date: 2026.05.13 16:12:08 +0530

(एस. एच. नलावडे)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
औसा
दि. १३.०५.२०२६